19 APR 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहूंच्या पुरोगामी विचारांनेच कोल्हापूरसह देशाची प्रगती

## शाहू छत्रपती : कृतज्ञता पर्वाला दिमाखदार प्रारंभ; विचारांचा डंका दिल्लीसह नागपूरपर्यंत पोहोचावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पुरोगामी विरुद्ध प्रतिगामी हा लढा शाहू महाराजांच्या काळापासून चालत आला आहे. चांगले ध्येय घेऊन काम सुरू केले की विरोध हा होतोच. शाहू महाराजांच्या विचारांचा वारसा घेऊन नवीन पिढीने शिक्षणाकडे लक्ष द्यावे, कुस्ती, कला-क्रीडा क्षेत्रात पुढे यावे. पुरोगामीत्वाच्या दिशेने चालत राहिलो तर कोल्हापूरच नव्हे तर देशाची प्रगती होईल, असा विश्वास शाहू छत्रपती यांनी सोमवारी येथे व्यक्त केला. शाहू महाराजांच्या या कृतज्ञता पर्वाचा डंका नागपूरपर्यंत पोहोचला पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतीशताब्दी वर्षानिमित्त आयोजित राजर्षी शाहू छत्रपती कृतज्ञता पर्वाला दिमाखात प्रारंभ झाला. भवानी मंडपात मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा रंगला. याअंतर्गत छत्रपती शाहू मिलसह जिल्ह्यात ठिकठिकाणी २२ मेपर्यंत शाहूंच्या विचारांचा जागर होणार आहे. शाहू महाराजांच्या कार्याचा वसा पुढच्या पिढीला देत महाराजांना जगभर पोहोचविण्याच्या उद्देशाने या कृतज्ञता पर्वाचे आयोजन करण्यात आले आहे. या उद्घाटन सोहळ्याला पालकमंत्री सतेज पाटील, खासदार संभाजीराजे, आमदार जयश्री जाधव, जयंत आसगावकर, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रकुलगुरू पी. एस. पाटील, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, महापालिका प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे, पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे उपस्थित होते.




कोल्हापुरातील भवानी मंडपात सोमवारी झालेल्या राजर्षी शाहू छत्रपती कृतज्ञता पर्व उद्घाटन समारंभात शाहू छत्रपती यांनी मार्गदर्शन केले. यावेळी आयुक्त कादंबरी बलकवडे, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, खासदार संभाजीराजे, पालकमंत्री सतेज पाटील, आमदार जयश्री जाधव, माजी आमदार मालोजीराजे, आमदार जयंत आसगावकर उपस्थित होते. (छाया : नसीर अत्तार)

सोहळ्यात शाहू छत्रपती यांनी खासदार संभाजीराजे यांचा चिमटा काढला. ते म्हणाले, आपण शाहूंचे कार्य देशात पोहोचविण्याचा प्रयत्न करत आहात. त्यांच्या कार्याची महती अभ्यासपूर्ण मांडता आहात ही खूप चांगली गोष्ट आहे. पण हे जरा लवकर कळलं असतं तर बरं झालं असतं. उशिरा का होईना केंद्रातील नेत्यांना शाहू समजायला लागलेत ही चांगली गोष्ट आहे. शाहू महाराजांच्या या कृतज्ञता पर्वाचा डंका पार नागपूरपर्यंत पोहोचला पाहिजे.

पालकमंत्री सतेज पाटील म्हणाले, शाहू महाराजांनी सर्वच क्षेत्रात उमटवलेल्या कार्यकर्तुत्वाचे प्रतिबिंब अनेक राज्यांत उमटले. शाहूंचा इतिहास लाभलेल्या कोल्हापुरात दैदिप्यमान भूगोल निर्माण करण्याची ताकद आहे. त्याची सुरुवात शाहू कृतज्ञता पर्वाने करूया. याअंतर्गत दागिन्यांची जत्रा, कला-सांस्कृतिक उपक्रम, कृषी प्रदर्शन, शाहिरी, चप्पल महोत्सव, तालुकावार कुस्ती स्पर्धा, राधानगरी ट्रेक, कलाकृती असे अनेक उपक्रम घेतले जाणार आहेत.

### १०० व्याख्याने

मंत्री पाटील म्हणाले, या पर्वांतर्गत ५ मे रोजी जिल्ह्यात एकाचवेळी १०० व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले आहे. ६ मे रोजी शाहू मिल ते शाहू समाधी स्थळापर्यंत समता फेरी काढण्यात येणार आहे.




खासदार संभाजीराजे म्हणाले, शाहू महाराज हे संवेदनशील लोकनेते होते. शोषित, अन्याय सहन करणाऱ्या जनतेची अवस्था बघून त्यांनी बहुजनांचे लढे उभारले. जे ज्या-ज्या ठिकाणी गेले तिथे शाहू कृतज्ञता पर्व झाले पाहिजे. शाहू महाराजांनी उभारलेल्या वास्तूंची दुरवस्था झाली आहे. त्या वास्तूंचा जीर्णोद्धार होणे ही त्यांना वाहिलेली खरी कृतज्ञता असेल.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेतला. जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी प्रास्ताविकात आपण सगळे कोल्हापूरचा विकास करून शाहू महाराजांना आदरांजली वाहूया, असे सांगून शाहू कृतज्ञता पर्वाच्या आयोजनामागील उद्देश सांगितला. या विचार पर्वात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले. प्राचार्य महादेव नरके यांनी सूत्रसंचालन केले.

लोकमत

# गो. मा. पवार यांच्या विवेकनिष्ठ दृष्टीची गरज

## अविनाश सप्रे : विद्यापाठीत साहित्य चर्चा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : गो. मा. पवार यांच्या विवेकनिष्ठ जीवनदृष्टीची आजच्या साहित्यसृष्टीला मोठी गरज आहे, असे प्रतिपादन प्रा. अविनाश सप्रे यांनी शनिवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे पहिले विभागप्रमुख डॉ. गो. मा. पवार यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'गो. मा. पवार : व्यक्ती आणि विचार' या विषयावर आयोजित साहित्यचर्चा या कार्यक्रमात ते बोलत होते. विद्यापीठाच्या नीलांबरी सभागृहातील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्रा. सप्रे म्हणाले, गो. मा. पवार यांनी मराठीत नवा समीक्षाविचार निर्भीडपणे मांडला. त्यांनी लिहिलेले लेख आजच्या समीक्षकांसाठीही मार्गदर्शक स्वरुपाचे आहेत. पवार यांच्या अनेक आठवणींमधून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची आणि कार्यपद्धतीची ओळख प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांनी करून दिली. पोवार हे मराठीतील एक स्कूल होते.



या स्कूलमुळे अनेक विद्यार्थ्यांना साहित्याकडे बघण्याची नवी दृष्टी मिळाली, असे मत प्राचार्य अशोक बाबर यांनी व्यक्त केले. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, गो. मा. पवार यांनी मराठी विभागाला कामाची आणि विचारांची शिस्त लावून दिली आहे. पुढील वाटचालीसाठी वस्तुपाठ घालून दिला आहे. त्यानुसार हा विभाग वाटचाल करत आहे. यावेळी राहुल पवार, राजेश पाटील उपस्थित होते. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. संगीता मोहिते यांनी आभार मानले.

लोकमत

# विद्यापीठात २५ एप्रिलपासून पुनर्परीक्षा; ९ हजार परीक्षार्थी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** तांत्रिक कारणामुळे पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या नऊ हजार विद्यार्थ्यांना हिवाळी सत्रातील परीक्षा देता आली नव्हती. त्यांच्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून दि. २५ एप्रिलपासून पुनर्परीक्षा घेण्यात येणार आहे. ऑनलाइन स्वरूपात परीक्षा होणार आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने हिवाळी सत्रातील विविध अभ्यासक्रमांच्या ३६२ परीक्षा ऑनलाइन घेतल्या. त्यात तांत्रिक आणि इतर कारणांमुळे काही विद्यार्थ्यांना एक-दोन विषयांचे पेपर देता आले नव्हते. त्यांच्यासाठी विद्यापीठाने पुनर्परीक्षा घेण्याचे ठरविले. या परीक्षेसाठी ऑनलाइन नावनोंदणी करण्याचे अशा विद्यार्थ्यांना आवाहन केले. त्यावर नऊ हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. त्यांची पुनर्परीक्षा दि. २५ एप्रिलपासून घेण्यात येणार आहे.

साधारणतः दि. ५ मे पर्यंत होणाऱ्या परीक्षेत विविध अभ्यासक्रम, विषयांचे १०० पेपर घेतले जाणार आहेत. त्याबाबतची तयारी परीक्षा मंडळाने पूर्ण केली आहे. हिवाळी सत्रात घेतलेल्या ९५ टक्के परीक्षांचे निकाल आतापर्यंत जाहीर करण्यात आले असल्याची माहिती परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी सोमवारी दिली.

पुढारी

# विद्यापीठाच्या वतीने २५ एप्रिलपासून पुनर्परीक्षा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर-२०२१ हिवाळी सत्रातील २५ एप्रिलपासून विद्यापीठ स्तरावरील अभ्यासक्रमांच्या पुनर्परीक्षांना प्रारंभ होणार आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून सुमारे ९ हजारांहून विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत.




हिवाळी सत्रातील परीक्षेवेळी काही विद्यार्थ्यांना तांत्रिक कारणास्तव परीक्षा देता आली नाही. अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडून उपलब्ध लिंकद्वारे नोंदणीचे आवाहन केले होते. पुनर्परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांसाठी पुनर्परीक्षा प्रारंभ तारखांचे वेळापत्रक विद्यापीठाने जाहीर केले आहे. त्यानुसार विद्यापीठ स्तरावर आयोजित अभ्यासक्रमांच्या पुनर्परीक्षा २५ एप्रिलपासून सुरू होणार आहेत.

विद्यापीठाच्या संकेतस्थळावर वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
19 APR 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गो. मा. पवार यांच्या विवेकनिष्ठ जीवनदृष्टीची गरज : प्रा. सप्रे

**कोल्हापूर :** गो. मा. पवार यांनी मराठीत नवा समीक्षा विचार निर्भीडपणे मांडला. गो. मा. पवार यांच्या विवेकनिष्ठ जीवनदृष्टीची आजच्या साहित्यसृष्टीला मोठी गरज आहे, असे प्रतिपादन प्रा. अविनाश सप्रे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे पहिले विभागप्रमुख डॉ. गो. मा. पवार यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित साहित्यचर्चेत ते बोलत होते. विद्यापीठाच्या नीलांबरी सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. यावेळी प्राचार्य डॉ. संतोष कोटी, प्राचार्य अशोक बाबर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. याप्रसंगी गो. मा. पवार यांचे चिरंजीव राहुल पवार उपस्थित होते. राजेश पाटील यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. संगीता मोहिते यांनी आभार मानले, तर सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले.

19 APR 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गो. मा. पवारांच्या जीवनदृष्टीची गरज

## प्रा. अविनाश सप्रे ; शिवाजी विद्यापीठात साहित्य चर्चा

कोल्हापूर, ता. १८ : गो. मा. पवार यांच्या विवेकनिष्ठ जीवनदृष्टीची आजच्या साहित्यसृष्टीला गरज आहे, असे मत प्रा. अविनाश सप्रे यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे पहिले विभागप्रमुख डॉ. गो. मा. पवार यांच्या स्मृतिदिनानिमित्त ''गो. मा. पवार : व्यक्ती आणि विचार'' विषयावर साहित्य चर्चा आयोजित केली होती. त्यावेळी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. नीलांबरी सभागृहात कार्यक्रम झाला.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे पहिले विभागप्रमुख डॉ. गो. मा. पवार यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'गो. मा. पवार : व्यक्ती आणि विचार' विषयावर साहित्य चर्चेत बोलताना प्रा. अविनाश सप्रे.**

प्रा. सप्रे म्हणाले, ''पवार यांनी मराठीत नवा समीक्षा विचार निर्भीडपणे मांडला. त्यांनी लिहिलेले लेख आजच्या समीक्षकांसाठीही मार्गदर्शक स्वरुपाचे आहेत.'' कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ''पवार यांनी मराठी विभागाला कामाची आणि विचारांची एक शिस्त लावून दिली आहे. पुढील वाटचालीसाठी एक वस्तुपाठ घालून दिला आहे. त्यानुसार हा विभाग वाटचाल करतो आहे, याचा आनंद वाटतो.''

प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांनी पवार यांच्या अनेक आठवणींमधून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची आणि कार्यपद्धतीची ओळख करून दिली. प्राचार्य अशोक बाबर यांनी पवार मराठीतील एक स्कूल होते. या स्कूलमुळे अनेक विद्यार्थ्यांना साहित्याकडे बघण्याची नवी दृष्टी मिळाली, असे मत व्यक्त केले.

अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. राहुल पवार उपस्थित होते. राजेश पाटील यांनी परिचय करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. संगीता मोहिते यांनी आभार मानले.

19 APR 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रदूषणमुक्तीसाठी महाविद्यालयांचाही सक्रिय सहभाग

## “ विद्यार्थी करणार जनजागृती; पंचगंगा घाटावर करणार प्रदूषणमुक्तीचा संकल्प ”

**कोल्हापूर, ता. १८ : पंचगंगा नदी प्रदूषणमुक्त व्हावी, यासाठी 'सकाळ'ने मोहीम हाती घेतली आहे. या अंतर्गत राजर्षी शाहू कृतज्ञता जलदिंडीचे आयोजन केले आहे. शुक्रवारी (ता. २२) पंचगंगा घाटावर सकाळी ७ वाजता प्रदूषणमुक्तीचा संकल्प केला जाणार आहे. विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार असून, या मोहिमेचा ते भाग बनणार आहेत. मोहिमेला महाविद्यालयाचे प्राचार्य, विभागप्रमुख यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.**



महाविद्यालयीन शिक्षण हे केवळ पुस्तकी नसते, तर त्यात विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांतील कार्यानुभव घेणेही महत्त्वाचे असते. 'सकाळ'च्या नदी स्वच्छता अभियानात सहभाग घेतल्याने विद्यार्थ्यांना पर्यावरण, नदी संवर्धन या विषयीची माहिती होणार आहे. त्यांच्या नागरी कर्तव्याची जबाबदारीही कळणार आहे. त्यामुळेच या मोहिमेत अधिकाधिक महाविद्यालये आणि विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे.

**- डॉ. हेमंत कटरे**, विभागीय शिक्षण सहसंचालक



शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभाग पूर्वी झालेल्या 'सकाळ'च्या पंचगंगा स्वच्छता मोहिमेत सहभागी झाला होता. यंदाही आमचा यात सक्रिय सहभाग आहे. या मोहिमेंतर्गत होणाऱ्या जलदिंडीत विभागातील अध्यापक, विद्यार्थी सहभागी होतात. पाण्याचे नमुने घेण्याबरोबरच ते नदी पात्रातील जैवविविधताही नोंदवतात. त्यामुळे नदीची संकीर्ण माहिती संकलित होते.

**- डॉ. असावरी जाधव,**
विभाग प्रमुख, पर्यावरणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ



पंचगंगा हा तसा कोल्हापूरकरांसाठी जिव्हाळ्याचा विषय आहे. काही महिन्यांपासून पंचगंगा प्रदूषित झाल्याच्या अनेक बातम्या प्रसिद्ध झाल्या. त्या वाचल्यावर मन बैचेन झाले. सकाळ माध्यम समूहाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात पंचगंगा स्वच्छतेची मोहीम राबवली जाणार आहे. आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी यात सहभागी होतील.

**- प्राचार्य सुनेत्रा पाटील**, राजाराम महाविद्यालय



पंचगंगा नदी प्रदूषण हा पर्यावरणीय तसेच सामाजिक प्रश्नही आहे. अनेक लोक वेगवेगळ्या कारणांनी तिच्यावर अवलंबून आहेत. माणूस आणि पर्यावरण संवर्धनासाठी नदी प्रदूषणमुक्त काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांनाही या प्रश्नाचे गांभीर्य कळले पाहिजे. जलप्रदूषण थांबण्यासाठी व्यक्तिगत पातळीवरही प्रयत्न केले पाहिजेत, ही भावना विद्यार्थ्यांत निर्माण झाली पाहिजे. यासाठी आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने या मोहिमेत सहभागी होतील.

**- प्राचार्य डॉ. अनिल कुलकर्णी**, सायबर महिला हाविद्यालय



महापूर असो किंवा कोरोनाचे संकट असो महावीर महाविद्यालयाने नेहमीच सामाजिक दायित्व निभावले आहे. महाविद्यालयाचे विद्यार्थी सर्वच सामाजिक उपक्रमात अग्रभागी असतात. 'सकाळ'तर्फे राबवल्या जाणाऱ्या पंचगंगा स्वच्छता मोहिमेतही महावीर महाविद्यालयाचे विद्यार्थी अधिक संख्येने सहभागी होतील. याबाबत समाजाचे प्रबोधनही करतील.

**- प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे,**
महावीर महाविद्यालय



नदी प्रदूषण गंभीर समस्या आहे. औद्योगिकरण आणि शहरीकरणामुळे नदी प्रदूषणात वाढ झाली आहे. ग्रामीण भागातही नदी प्रदूषण वाढल्याचे दिसते. मानवी आरोग्य आणि पर्यावरण संवर्धनासाठी नदीचे पाणी स्वच्छ होणे आवश्यक आहे. 'सकाळ'ने हाती घेतलेला उपक्रम महत्त्वाचा असून राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक - स्वयंसेविका मोठ्या संख्येने यामध्ये सहभागी होतील. राष्ट्रीय सेवा योजना आणि 'सकाळ'यांच्या माध्यमातून होणारी नदी स्वच्छता मोहीम ही पर्यावरण संतुलनाची नवी पहाट आहे.

**- प्रा. अभय जायभाये**
(संचालक, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, शिवाजी विद्यापीठ)

सकाळ



कोतोली : राष्ट्रीय चर्चासत्रात बोलताना डॉ. पी. एस. पाटील. शेजारी डॉ. अजय चौगुले, डॉ. जे. एफ. पाटील आदी.

# कोतोली महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्र

पुनाळ, ता. १८ : कोरोना व्हायरसमुळे संपूर्ण जग स्तब्ध झाले होते तेव्हा शिवाजी विद्यापीठामधील प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थ्यांनी या व्हायरसवर संशोधन करून महत्त्वाची भूमिका बजावल्याचे मत प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी व्यक्त केले.

श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी, कोतोली (ता.पन्हाळा) येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, विज्ञान विभाग व शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण, विस्तार, कौशल्य विभागातर्फे राष्ट्रीय चर्चासत्रात ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक डॉ. अजय चौगुले होते.

डॉ. पाटील म्हणाले की, लस तयार करण्यामध्ये विद्यापीठाचे महत्त्वाचे योगदान आहे. कोरोना प्रतिबंधक स्प्रेची निर्मिती भौतिकशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी करून कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमध्येही शिवाजी विद्यापीठाचा नावलौकिक जगभर केल्याने शिवाजी विद्यापीठाला अनेक पुरस्कार मिळाले.

डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. ए. एम. गुरव यांनी सविस्तर माहिती दिली. चौथ्या सत्रात एकूण ७४ शिक्षक, संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनींनी संशोधन पेपरचे वाचन केले. संस्था सचिव शिवाजीराव पाटील, संचालक वेदिका चौगुले, प्र. प्राचार्य डॉ. व्ही. पी. पाटील, समन्वयक एस. एम. चौगुले उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. बी. एन. रावण यांनी केले. पाहुण्यांची ओळख एस. एम. चौगुले यांनी करून दिली. सूत्रसंचालन आर. बी. जाधव यांनी केले. आभार ए. एस. कुंभार यांनी मानले.

तरुण भारत

# २५ एप्रिलपासून पुनर्परीक्षेला प्रारंभ

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील ऑनलाईन पुनर्परीक्षेला सोमवार (दि. २५) रोजी सुरूवात होणार आहे. हिवाळी सत्रातील परीक्षा देण्यासाठी ज्या विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचण आली आहे. त्यांच्यासाठी पुर्नपरीक्षेचे अर्ज भरण्यासाठी लिंक ओपन करून दिली होती. संबंधीत विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीत अर्ज भरलेला आहे, अशा विद्यार्थ्यांची परीक्षा सुरू होणार आहे. तरी याची दखल संबंधीत विद्यार्थ्यी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी घ्यावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे यांनी केले आहे.



- **विद्यापीठाच्या संकेतस्थळावर सविस्तर माहिती उपलब्ध**

विद्यापीठ अंतर्गत ९०० विषयांच्या ऑनलाईन पुनर्परीक्षा होणार आहे. या परीक्षेला सर्वसाधारण ९ हजार विद्यार्थी बसणार आहेत. परीक्षेसंदर्भात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर परीक्षेचा डेमो उपलब्ध करून दिला आहे. ऑनलाईन पुनर्परीक्षा देण्याची विद्यार्थ्यांना ही शेवटची संधी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी संकेतस्थळावरील परीक्षेचे वेळापत्रक व परीक्षेचा डेमो पाहावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठातील परीक्षा विभागाच्या वतीने केले आहे.